# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

जुलै 2008 | खाजगी वितरणासाठी | खंड 1 अंक 4


प्रिय बंधू भगिनींनो,

एस आर सी एम इंडिया न्युजलेटरचे नाव बदलून आता एकोज इंडिया असे ठेवण्यात आल्याचे जाहीर करण्यात आम्हाला आनंद होत आहे. श्री रामचंद्र मिशनच्या जगभरातून प्रकाशित होणाऱ्या सर्व न्युजलेटरना एकच नाव असावे म्हणून हा बदल करण्यात आलेला आहे.

सुट्टीच्या काळात देशभरातील आश्रम, लहान मुलांच्या व तरुणांच्या शिबीराने गजबजून गेले होते. बाबूजींचा जन्मोत्सव प्रत्येक झोनमधील काही निवडक आश्रमात साजरा करण्यात आला. गुरुदेवांच्या पन्नास दिवसांच्या दीर्घ सी आय एस व युरोप यात्रेने, सहजमार्गाच्या छत्राखाली सर्वांना एकत्र आणण्याची 'त्यांची' प्रतिबध्दताच आम्हाला दाखवून दिली. आम्ही वरील काही घटनांना व गुरुदेवांच्या लखनौ येथील कार्यक्रमाच्या पूर्वतयारीला या अंकात सम्मिलित करण्याचा प्रयत्न केला आहे.

सप्टेंबरच्या अंकासाठी, लेख, बातमी पाठविण्याची शेवटची तारीख 10 ऑगस्ट 2008 राहील. कृपया आपले लिखाण 100–150 शब्दात, त्या घटनेच्या छायाचित्रासह, झोनल इन्चार्ज यांच्यामार्फत आमच्याकडे पाठवावे.

आदरपूर्वक,

संपादकीय मंडळ.







## गुरुदेवांची एप्रिल–मे 2008 यात्रा

### दिल्ली

लखनौहून 19 एप्रिल रोजी गुरुदेवांचे आगमन झाले. गुरगाव येथील आश्रमाचे नूतनीकरणाचे काम अग्रक्रमाने हाती घेऊन गुरुदेवांच्या भेटीपूर्वी पूर्ण करण्यात आले होते.

या आश्रमाला आता एक नवे रूप लाभलेले आहे. तेथे आता सुधारणा केलेले विस्तारित ध्यानकक्ष, मास्टर कॉटेज, स्वयंपाक गृह व भोजनकक्ष, स्टोअर तसेच नवीन प्रसाधनगृह, पक्के रस्ते व हिरव्यागार गवतांचे पटांगण आहे.

गुरुदेवांनी 20 एप्रिल रोजी कॉटेजचे उद्घाटन केले, व त्या प्रित्यर्थ दोन रोपट्यांचे वृक्षारोपण केले.

सत्संगा नंतर अभ्यासींशी गप्पा मारण्यात, बाळांचे नामकरण करण्यात, लहान मुलांना मिठाई वाटण्यात व स्वयंसेवकांना बक्षिसे देण्यात गुरुदेवांनी वेळ व्यतीत केला. भगिनी रंजनाच्या भजनाने त्या दिवसाच्या कार्यक्रमावर विशेष ठसा उमटवला.





### दुबई

गुरुदेवांच्या विदेश यात्रेत दुबई हे मध्यावर थांबण्याचे खास ठिकाण झालेले आहे. याचे कारण म्हणजे ठरलेल्या ठिकाणी पोहचण्यासाठी गुरुदेवांना त्यातल्यात्यात कमी वेळेचा विमान प्रवास आवडतो.

22 एप्रिलला गुरुदेव, बंधू अजय भट्टर व इतर 25 भारतीय अभ्यासींच्या सोबत दिल्लीहून विमानाने दुबईला निघाले. एका अभ्यासीच्या फ्लॅटमध्ये गुरुदेवांनी मुक्काम केला व खालच्या मजल्यावरील सार्वजनिक हॉलमध्ये सत्संग घेतला. अबू धाबी केंद्राला धावती भेट देण्यासाठी त्यांनी वेळ काढला. 25 एप्रिल रोजी, युनायटेड अरब एमिरेट्सच्या जमलेल्या 350 अभ्यासींसाठी इराणी क्लब दुबई येथे गुरुदेवांनी सत्संग घेतला. एका तासाच्या सत्संगातील वातावरणामधून, तेथील अभ्यासींच्या स्थितीची कल्पना आल्याने, गुरुदेवांनी, तेथील प्रशिक्षकांच्या चांगल्या कामाची प्रशंसा केली. 26 एप्रिल रोजी गुरुदेवांनी मॉस्कोकडे प्रयाण केले.





## सी आय एस येथील अभ्यासींवर 'त्यांचा' प्रकाशवर्षाव

जवळ जवळ एका दशकानंतर गुरुदेवांनी रशिया व बेलारुसला भेट दिली तेव्हा सी आय एस (पूर्वीचे यु एस एस आर / रशियन भाषा बोलणारे राष्ट्र) येथील अभ्यासींची हृदये आनंदाने भरून गेली. मॉस्को येथील लिझ्मा पेन्शनत येथे बाबूजी महाराजांचा जयंती उत्सव साजरा झाला. त्यामध्ये गुरुदेव उपस्थित होते. तेथे जमलेल्या 450 अभ्यासींच्या आध्यात्मिक गरजा भागविण्यामध्ये त्यांना आनंद वाटला. दररोजच्या अफाट कामामुळे, सततच्या कष्टप्रद प्रवासामुळे त्यांच्या तब्येतीची तक्रार असताना सुध्दा ते प्रसन्न चित्त होते व अभ्यासींशी संवाद साधून सहज मार्गाची शिकवण व साधना समजावून (बऱ्याच वेळा अस्खलीत रशियन भाषेमध्ये) सांगण्यात मग्न होते. मॉस्कोसाठी एका आश्रमाच्या/ ध्यानकक्षाच्या योजनेला त्यांनी मूर्त स्वरूप दिले व त्यासाठी लागणारा स्त्रोत स्वत: उभा केला.

मॉस्को येथे एक आठवडा थांबून नंतरचे पाच दिवस गुरुदेव मिन्स्क, बेलारुस येथे 250 अभ्यासींच्या प्रेमळ सहवासात राहिले. बंधू इगोर ऑनिझेन्को यांच्या योग केंद्राचा शिलान्यास गुरुदेवांच्या हस्ते झाला. मिन्स्क केंद्राच्या सत्संगासाठी व इतर कार्यक्रमासाठी हे ठिकाण उपलब्ध असणार आहे.

मॉस्को येथील वास्तव्यात तब्येतीच्या तक्रारीमुळे, तेथील अभ्यासींनी सादर केलेला रंगीन व प्रेमाने ओतप्रोत भरलेला सांस्कृतिक कार्यक्रम गुरुदेव पाहू शकले नव्हते परंतु त्याची भरपाई बेलारुस येथील अभ्यासींनी, मिन्स्क आश्रमातील मोकळ्या चौरसामध्ये स्वच्छ सूर्यप्रकाशात नृत्य–गायनाच्या कार्यक्रमाने, केली. संपूर्ण यात्रे दरम्यान लख्ख सूर्यप्रकाश होता. जणू काही गुरुदेवांची, रशियन भाषिक देशांमधील त्यांच्या प्रिय भक्तांसाठी दिलेली भेट निसर्गानेही साजरी करण्याची योजना आखली होती असेच भासत होते.

## युरोपियन देशांकडे



लॅटविया हे बाल्टिक देशांपैकी एक, पूर्वाश्रमीचे सोव्हीएट रिपब्लिक, आता युरोपियन समुदायामध्ये सामिल झाले आहे. रिगा हे राजधानी चे शहर समुद्राकाठचे रिसॉर्ट म्हणून प्रसिध्द आहे. येथे आपले केंद्र असून 40 अभ्यासी व स्वत:चा छोटासा ध्यानकक्ष आहे. 6 मे रोजी मिन्स्क (बेलारुस) येथून दोन दिवसाच्या भेटीसाठी गुरुदेव विमानाने रिगा येथे आले. समुद्राकाठच्या एका हॉटेलमध्ये त्यांचे वास्तव्य होते व तेथेच त्यांनी दोन सत्संग घेतले.

गुरुदेवांना पाठीच्या व पायाच्या दुखण्याने त्रस्त केले होते. तरीही युरोप यात्रेचा त्यांचा निर्धार पक्का होता. या बाबत त्यांचा तर्क होता – एका व्यक्तीच्या समस्येमुळे, बाकी सर्वांचे नुकसान का व्हावे?




प्रकृतीकडे पाहून गुरुदेवांनी त्यांच्या यात्रेत बदल करून डेन्मार्क येथील व्रॅड सॅन्डे आश्रमाकडे तीन आठवड्याच्या वास्तव्यासाठी प्रयाण केले. येथील वास्तव्यातील काही दिवसातच त्यांची प्रकृती सुधारली व युरोपियन अभ्यासींनी गटागटाने यावयास व त्यांच्यासोबत रहावयास सुरवात केली. एकूण 1200 अभ्यासी आले. व्रॅड हे गुरुदेवांसाठी त्यांचे दुसरे घरच आहे. तेथे ते वरचेवर चालून येत, कधी आश्रमामधील स्वयंपाकगृहाकडे, भोजनकक्षाकडे तर कधी ध्यानकक्षापर्यंत ते चालत. बऱ्याच वेळा बाहेरच्या बाजूस ते अभ्यासींच्या सोबत बसत. त्यांच्या कॉटेजच्या मागच्या बाजूच्या डेकवरुन जेव्हा ते सिटींग देत तेव्हा सर्व अभ्यासी तेथील सभोवतालच्या उतरत्या जागेवर ध्यानासाठी बसत.

व्रॅड सॅन्डे आश्रम हा आंतरराष्ट्रीय आश्रम झाल्याची घोषणा गुरुदेवांनी केली. त्यांनी यावर आधारित एक छोटेसे भाषण दिले व जगभरातील तरुणांना विशेष करून येथे भेट देण्यासाठी आमंत्रित केले.







व्रॅड येथून सत्तर अभ्यासींच्या सोबत गुरुदेव गाडीने निघाले व सहाशे कि.मी. अंतर व चार देशांच्या सीमा ओलांडून पॅरिस येथे 26 मे च्या सकाळी पोचले. शहरातील एका हॉटेलमध्ये त्यांनी वास्तव्य केले व 28 ता. स. पॅरिस आश्रमामध्ये 200 अभ्यासींसाठी सत्संग केला.

पुढचे पाच दिवस गुरुदेव कॅलेट येथील पर्वतराजीच्या सान्निध्यातील एका अभ्यासीच्या घरी थांबले. येथे त्यांना विश्रांती मिळाली व ते ताजेतवाने झाले. तरीपण त्यांनी मॉंटपेलीअर केंद्रातील आश्रमाला भेट दिलीच व 150 अभ्यासींसाठी सत्संग घेतला.



आल्प्स पर्वतराजीमधून तसेच तेरा कि.मी. च्या बोगद्यातील प्रवासाने 5 जून रोजी गुरुदेवांचे मिलान (इटली) येथे आगमन झाले. वाटेत ॲस्टा या मिशनच्या केंद्रामध्ये थांबून त्यांनी इटालीयन भोजनाचा आस्वाद घेतला. दुसऱ्या दिवशी गुरुदेवांनी मिलान येथील नवीन ध्यानकक्षाचे उद्‌घाटन केले व तेथे त्या दिवशी व दुसऱ्या दिवशी सत्संग घेतला.

8 जून 2008 रोजी त्यांची ही सी आय एस व युरोपची ऐतिहासिक यात्रा संपवून गुरुदेव विमानाने दुबईला पोहचले. तेथून ते 15 जूनला भारतात परततील.

## एस एम एस एफ रिट्रीट सेंटर, मलंपुझा

केरळातील मलंपुझा येथील रिट्रीट सेंटर 14-04-08 पासून कार्यरत झाले. मिशनचे हे पहिले रिट्रीट सेंटर आहे. दुसरे पुणे येथे सुरू झाले आहे.

या केंद्रामध्ये 48 अभ्यासी राहू शकतात. वसतिगृहाची इमारत दोन भागामध्ये विभाजित आहे. एक भाग महिलांसाठी व दुसरा पुरुषांसाठी. शक्यतो वयस्क लोकांची व्यवस्था तळमजल्यावर केली जाते. पलंग, गादी, व चादरींची सोय केलेली आहे. येथील निवास विनामूल्य आहे. तीन दिवसापासून तीस दिवसापर्यंत येथे राहता येते. पती पत्नी एकाचवेळी येथे राहू शकत नाहीत. मुलांना परवानगी नाही.

हे केंद्र कावा या परिसरात असून ते चेंबाना बस स्थानकापासून जवळ आहे. मलंपुझा बस स्थानकापासून याचे अंतर 6 कि.मी. आहे. पलक्कड रेल्वेस्थानकापासून याचे अंतर 15 कि.मी. असून पलक्कड शहरापासून 20 कि.मी. तर कोईम्बतूर विमानतळापासून 55 कि.मी. आहे. पलक्कड पासून मलंपुझासाठी दैनंदिन बससेवा आहे. मलंपुझापासून केंद्रावर पोचण्यासाठी टॅक्सी, जीप व रिक्षाची सोय आहे. मलंपुझापासून कावाला जाण्यासाठी बससेवा आहे, परंतु नियमित नाही. बसने जाणाऱ्यांना चेंबाना स्थानकावर उतरून तेथून केंद्राला चालत जाता येते. चेंबाना स्थानकावर उतारूंच्या माहितीसाठी एस एम एस एफ चा फलक लावण्यात आला आहे. चेंबाना स्थानकाजवळ खूण म्हणून पॉवर ट्रान्स्फॉर्मर स्थित आहे.

रिट्रीट केंद्राच्या तारखा ठरविण्यासाठी कृपया खालील संकेत स्थळावर भेट द्यावी

http://sahajmarg.org/welcome/retreat/index.html

## ‘Our Master’ चे मॉस्को येथे प्रकाशन




आवर मास्टर 'Our Master' या पुस्तकाचे मॉस्को येथे 30 एप्रिल 2008 रोजी पू. गुरुदेवांच्या हस्ते प्रकाशन झाले. गुरुदेवांचा सहवास बरीच वर्षे लाभलेल्या अभ्यासींनी लिहीलेल्या लेखाचा हा एक संग्रह आहे. अभ्यासींनी या मध्ये त्यांचे अविस्मरणीय अनुभव व भावना व्यक्त केल्या आहेत.

## लखनौ



16 एप्रिल रोजी गुरुदेवांनी लखनौला भेट देऊन नव्याने बांधलेल्या मास्टर कॉटेजचे आनंदी वातावरणामध्ये उद्घाटन केले. दोन एकर जागेत बांधलेल्या या कॉटेजभोवती भरपूर हिरवळ आहे. विविध शहरांमधून आलेल्या 4000 अभ्यासींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

## जुलै उत्सवाची तयारी

वाचकांना आम्ही आठवण करून देऊ इच्छतो की पूज्य गुरुदेवांचा 81 वा वाढदिवस उत्तर प्रदेशातील लखनौ येथे 23 ते 25 जुलै 2008 दरम्यान साजरा होणार आहे. त्यासाठीची तयारी पूर्ण वेगात चालू आहे आणि या तारखेपर्यंत संपूर्ण देशभरातून 25000 पेक्षा जास्त अभ्यासींनी नावे नोंदविली आहेत. हा आकडा 35000 पर्यंत जाण्याची अपेक्षा आहे.

लखनौ येथील आश्रम सितापूर-हरदोई बाय पास रोडवर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट च्या जवळ असून 100 एकर जागेत वसलेले आहे. लखनौ रेल्वे स्टेशन पासून 20 कि.मी. तर विमानतळापासूण 25 कि.मी. अंतरावर आहे. दोन्ही ठिकाणापासून अभ्यासींना घेण्याची व सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

जुलैमध्ये उष्ण व दमट हवा असणार आहे त्यामुळे अभ्यासींना विनंती आहे की स्वत:च्या सोयीसाठी छत्री किंवा रेनकोट आणि हातपंखे त्यांनी सोबत आणावे. वॉटर प्रुफ तंबूने 1,50,000 चौ. फुटाच्या ध्यानकक्षाला व 1,00,000 चौ. फुटाच्या स्वयंपाकगृह / भोजनकक्षाला आच्छादित केलेले असेल. रजिस्ट्रेशन विभागासोबतच, मेडिकल सेंटर, ॲम्ब्युलन्स, बॅंकिंग, इंटरनेट, प्रशस्त कॅन्टीन, चिल्ड्रेन कॉर्नर, पुस्तकालय इ. महत्वाच्या सेवा उपलब्ध असतील. सर्व अभ्यासी बंधू भगिनींसाठी सर्वसाधारण राहण्याची व्यवस्था विनामूल्य असेल. अंथरुण पांघरूण विकत घेण्याची सोय राहील तथापि सुरवातीच्या लोकांना भाड्याने देखील मिळू शकेल. कम्फर्ट डॉर्मीटरीमध्ये अंथरुण, गादी, चादर, उशी आणि मच्छरदाणीची सोय असेल.


या उत्सवा दरम्यान विवाहबध्द होणाऱ्या अभ्यासींच्या कुटुंबांच्या सोयीसाठी व लग्नाचा वाढदिवस साजरा करणाऱ्या अभ्यासींसाठी अल्पोपहाराची व रात्रीच्या भोजनाची स्वतंत्र व्यवस्था केलेली असेल.

कार्यक्रमापूर्वी व नंतरच्या कामांसाठी बऱ्याच स्वयंसेवकांची गरज आहे. 3000 मुले अपेक्षित असल्यामुळे त्यांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज आहे. इच्छुक स्वयंसेवकांची नावे सर्व केंद्रांनी खालील संकेतस्थळावर पाठवावीत

mehrotrashyamji@yahoo.co.in

हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तुमच्या संपूर्ण मदतीची व पाठिंब्याची गरज आहे. हा शुभप्रसंग अविस्मरणीय करू या.

# बाबूजींच्या १०९ व्या जयंतीप्रित्यर्थ कार्यक्रम



## म्हैसूर

म्हैसूर येथील रिजनल आश्रमामध्ये 30 एप्रिलच्या कार्यक्रमासाठी म्हैसूर, हसन, हुनसूर, हनूर, चिकमंगळूर, कोलेगल, बेंगलोर, पेरीयापटना, कुशालनगर, टी नरसीपुरा आणि चामराजनगर केंद्रातील 450 अभ्यासी, पू. बाबूजी महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी एकत्र जमले तेव्हा तो आश्रम सजीव झाला.



दोन सत्संगाव्यतिरिक्तचा दिवसभरातील वेळ अभ्यासींनी उपयुक्तपणे घालविला. बाबूजी महाराजांच्या जीवनावर व शिकवणीवर आधारित एक व्हिडीओ टेप सर्वांनी पाहिली याला पूरक म्हणून भगिनी कल्पनाने बाबूजींच्या छायाचित्रांचे सादरीकरण केले. हुनसूर केंद्राच्या अभ्यासींनी याच विषयावर एक प्रश्नमंजुषा घेतली. या नंतर लहान मुलांनी व्यासपीठावर येऊन गाणी, नाटिका, प्रार्थना, भाषणे सादर केली. साधनापध्दतीबद्दल व गुरुदेवांच्या बद्दल इतक्या प्रभावीपणे व चांगल्याप्रकारे लहान मुलांना बोलताना ऐकून सर्वजण फारच उल्हासित झाले.

संपूर्ण वातावरण गुरुदेवांच्या उपस्थितीने भरून गेले होते आणि जमलेल्या सर्वांना भरपूर आध्यात्मिक लाभ झाला हे सांगण्याची आवश्यकताच नाही.

## उत्तराखंड

हा हिमालयाची पार्श्वभूमी असलेला पर्वतराजीचा परिसर त्यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने बाबूजींच्या नामाचा जयघोष करीत होता. हिमालयात मिशनचा झेंडा फडकविणाऱ्या सतखोल आश्रमात जवळपासच्या केंद्रांमधून 140 अभ्यासींनी एकत्र येऊन उत्साहाने व श्रध्दापूर्वक हा दिवस साजरा केला. या राज्याची राजधानी असलेल्या डेहराडून शहरात सत्संग, भजन, व्हिडीओ व बाबूजी महाराजांच्या जीवनावर व शिकवणीवर आधारित भाषणे झाली. रूरकी, पिथोरागड, हल्दवानी व काशीपूर या इतर केंद्रामध्ये हा दिवस उत्साहाने साजरा झाला.

## कोल्हापूर

कोल्हापूर, सातारा, मिरज व पुणे येथील अभ्यासींचा या कार्यक्रमात उत्साहवर्धक सहभाग होता. बेळगाव, गुलबर्गा व गोंदिया येथील काही अभ्यासी सुध्दा उपस्थित होते.

दिवसातील दोन सत्संगांच्या मधल्या वेळेत काही अभ्यासींनी बाबूजींच्या जीवनावर व शिकवणीवर आधारित भाषणे दिली. भगिनी नुरी व बंधू गोपाळ हे त्यांच्या भौतिक जीवनावर व लालाजी महाराजांच्या कृपाछत्राखाली झालेली त्यांची आध्यात्मिक प्रगती यावर बोलले. भगिनी लता पाटील यांनी बाबूजी व त्यांचे शिष्योत्तम, आपले गुरुदेव यांच्यामधील संबंधावर प्रकाश टाकला. बंधू ए एन कुलकर्णी, भगिनी अरुंधती काळे व बंधू सुधाकर जोशी यांनी त्यांच्या जीवनातील बाबूजी महाराजांबरोबर आलेले हृदयस्पर्शी अनुभव सांगितले.

या दिवसाची सांगता भगिनी स्नेहा राजूरकर यांनी गायलेल्या भक्तीगीताने झाली. सर्व केंद्रातील अभ्यासींनी न थकता स्वयंसेवकाची भूमिका बजावून हा कार्यक्रम यशस्वी केला.

## बडोदा

गुजरात झोनच्या 1300 अभ्यासींच्या कार्यक्रमाचे यजमानपद बडोदा केंद्राने भूषविले. पावसाच्या हलक्या सरी द्वारे निसर्गाने प्रेमळ असा कृपावर्षाव केला. आम्हाला खोलवर बुडवून टाकून आमच्या हृदयांना मुलायम करून सोडणाऱ्या दिव्य सत्संगानंतर, 'मास्टर्स चॉईस' या डी व्ही डी मधील हृदयस्पर्शी संगीताने सर्वांची हृदये विरघळून गेली. नुकत्याच झालेल्या गोवा यात्रेदरम्यान पू गुरुदेवांनी दिलेल्या संदेशाचे वाचन इंग्रजी व गुजरातीत करण्यात आले.

बंधू सुरेश यांनी, ध्यानाव्यतिरिक्तच्या इतर वेळेत सुध्दा गुरुदेवांशी आंतरिक संबंध अबाधित ठेवण्याच्या व त्यांची उपस्थिती जाणवून घेण्याच्या गरजेवर भर दिला. त्यांनी, अध्यात्माला प्राधान्य देण्यासाठी व उन्नती करून घेण्यासाठीचा उत्साह अंगी बाणविण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित केले. बंधू राजेंद्र राठोड यांनी "उन्नतीचा योग्य मार्ग – स्वयंसेवक बनणे" या विषयावर दिलेल्या भाषणाने प्रभावित झालेल्या अभ्यासींनी जुलै 2008 च्या कार्यक्रमासाठी नावे दिली.

भोजनानंतर पुन्हा ध्यानकक्षामध्ये जमलेल्या अभ्यासींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये आनंद, अंकलेश्वर, भरुच, भावनगर व बडोदा केंद्राचा समावेश होता अभ्यासी व त्यांच्या मुलांनी गीत, नाटिका व नृत्य सादर केले.

चहापानानंतर भगिनी सुमन दवे, बंधू भरत तन्ना व बंधू पुनित लालभाई यांनी अनुक्रमे 'सहजमार्गाच्या प्रसारामध्ये महिलांची भूमिका', 'साधनेतील सातत्य' आणि 'सहजमार्गात युवांची भूमिका' या विषयांवर भाषणे दिली. यानंतर बाबूजी महाराजांच्या युरोप यात्रेचा व्हिडीओ वृतांत दाखविण्यात आला.



## ओपन हाऊसचे सत्र

### मेंगलोर



3 एप्रिल 2008 रोजी मेंगलोर येथील चेतना शाळेमध्ये ओपन हाऊसचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मुख्यत: पालकांसाठी होता. या शाळेच्या संचालकांपैकी एक उत्साही डॉ. सविता यांच्या पुढाकाराने व केंद्रप्रमुख भगिनी गीता आचार्य यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम झाला.

श्री रामचंद्र मिशनच्या प्रशिक्षक व नजिकच्या, उप्पीनंगडी **येथील**, महाविद्यालयातील प्राध्यापक भगिनी वसंतकुमारी यांनी श्रोत्यांना माहिती दिली. त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. लोकांना व मुलांना समजावून घेणे, त्यांच्या गुण–दोषांसहित त्यांचा स्वीकार करणे, प्रेमावर आधारित संयम व सहनशीलतेची आवश्यकता इ. विषय चर्चिले गेले. जीवनाकडे योग्य प्रकारे बघण्याचा दृष्टिकोन विकास पावण्यासाठी अध्यात्म कसे सहाय्यक आहे यावर विस्तृत चर्चा झाली. उपस्थित पालकांच्या प्रतिसाद उत्साहवर्धक व सकारात्मक होता.



त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. लोकांना व मुलांना समजावून घेणे, त्यांच्या गुण–दोषांसहित त्यांचा स्वीकार करणे, प्रेमावर आधारित संयम व सहनशीलतेची आवश्यकता इ. विषय चर्चिले गेले. जीवनाकडे योग्य प्रकारे बघण्याचा दृष्टिकोन विकास पावण्यासाठी अध्यात्म कसे सहाय्यक आहे यावर विस्तृत चर्चा झाली. उपस्थित पालकांच्या प्रतिसाद उत्साहवर्धक व सकारात्मक होता.

महाविद्यालयातील प्राध्यापक भगिनी वसंतकुमारी यांनी श्रोत्यांना माहिती दिली. त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. लोकांना व मुलांना समजावून घेणे, त्यांच्या गुण–दोषांसहित त्यांचा स्वीकार करणे, प्रेमावर आधारित संयम व सहनशीलतेची आवश्यकता इ. विषय चर्चिले गेले. जीवनाकडे योग्य प्रकारे बघण्याचा दृष्टिकोन विकास पावण्यासाठी अध्यात्म कसे सहाय्यक आहे यावर विस्तृत चर्चा झाली. उपस्थित पालकांच्या प्रतिसाद उत्साहवर्धक व सकारात्मक होता.

### कारकला

18 मे 2008 रोजी बंधू रामानंद भट यांच्या अनेकेरे, कारकला येथील निवासस्थानी ओपन हाऊससाठी वीस अतिथी जमले होते. मेंगलोर येथील भगिनी पुष्पा यांनी सहजमार्गाबद्दल माहिती दिली, तसेच संतुलित जीवनासाठी सहजमार्ग कोणत्या प्रकारची मदत करतो याबद्दलही सांगितले. त्यांनी वैदिक साहित्य, भगवत गीता, बुध्दीझम मधील उत्कृष्ट उदाहरणे देऊन व काही भक्ती गीतांचा उल्लेख करून भाषणाचा समारोप केला.

## पुढचे पाऊल दावणगिरे केंद्र – कर्नाटक

पू. गुरुदेवांच्या कृपाशिर्वादाने व संमतीने दावणगिरे केंद्राने दोड्डाबट्टी गावा जवळ दावणगिरे पासून 8 कि.मी. व हरीहर पासूनही तेवढ्याच अंतरावर असलेल्या ठिकाणी दोन एकर शेतजमीन दि. 24 जानेवारी 2008 रोजी खरेदी केली.

दोन्ही केंद्रांसाठी सामुदायिक आश्रम उभारण्याची योजना आहे. या व्यतिरिक्त आणखी अडीच एकर जमीन अभ्यासींच्या गृह योजनेसाठी खरेदी केली आहे.

जवळच्या डोंगरावरून घेतलेले हे छायाचित्र आहे. या मध्ये लाल रंगाचा भाग – 1 मिशनसाठी आहे व भाग 2 हा अभ्यासी गृह योजनेसाठी आहे.




## सोलापूर, महाराष्ट्र येथील आश्रमाची नांदी



त्यांच्या 6 जुलै 2003च्या संदेशात बाबूजी महाराज म्हणतात, 'येणाऱ्या दशकात आश्रमांची संख्या वाढेल. या योजनेला आमची अनुकूलता आहे. वाढत्या गरजा भागविण्यासाठी वास्तू उभ्या करणे सूज्ञपणाचे आहे.'

याच दिशेने पुढचे पाऊल टाकले आहे सोलापूर केंद्राच्या अभ्यासींनी. 29 मे रोजी दीड एकर जमीन खरेदी करून आश्रम उभारणीसाठी मिशनकडे सुपूर्त करण्यात आली. सोलापूर–अक्कलकोट रस्त्यावर पाच कि.मी. अंतरावर हे ठिकाण आहे.

श्री रामचंद्र मिशनचे जॉईन्ट सेक्रेटरी बंधू ए पी दुराई आणि झोनल इन्चार्ज बंधू डॉ सुभाष वैद्य हे खरेदीखतासाठी व अभ्यासींसाठी ठेवलेल्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सोलापूर, बार्शी, उस्मानाबाद, लातूर व औसा येथील 120 अभ्यासी या प्रसंगी उपस्थित होते. सोलापूर केंद्रामध्ये पूर्वी कार्यरत असलेल्या पहिल्या प्रशिक्षक सौ अनसूया रामचंद्रन यांची प्रमुख उपस्थिती होती.

## उन्हाळी शिबीर

### बेंगलोर

स्वंयसेवक व पालकांनी प्रोत्साहन दिल्याने, शनिवार दि. 24 मे 2008 रोजी बनशंकरी आश्रमामध्ये 3 ते 18 वर्षे वयोगटातील चाळीस मुलांनी एका दिवसाच्या उन्हाळी शिबीरामध्ये भाग घेतला. दिवसाची सुरवात ओळख करून देण्याने झाली व त्यानंतर योगासने घेण्यात आली. त्यानंतर मुलांचे प्रत्येकी वीसचे दोन गट पाडण्यात आले. शिबीरामध्ये अनेक खेळ घेतले. ब्रेन ॲन्ड टीम कम्युनिकेशन गेममध्ये 9*9 चे चौकोन, प्लास्टर ऑफ पॅरिस मध्ये मुलाच्या हाताचा साचा बनविणे व नंतर मुलांनी रंगविणे त्याच बरोबर मुलांना काही वस्तू दिल्या ज्याच्या मधून मुलांनी कल्पकतेतून खेळ निर्माण केले जसे क्रिकेट, 'कुत्रा व हाड' इ. व्ही बी एस ई टीमने नैतिक मूल्याधारित शिक्षण संम्मिलीत केले. खाण्याच्या पदार्थाकडे विशेष लक्ष दिले गेले ज्या मध्ये मध्यान्हीला उत्साहवर्धक पेय, आईस्क्रीम बरोबरच दुपारच्या वेळेत फ्रुट सॅलेडचा समावेश करून एकूणात हा दिवस सर्वसमावेशक ज्ञानवर्धक व आनंदी ठरला.




### थिरुअनंथपुरम

20 एप्रिल रोजी थिरुअनंथपुरम (केरळ) केंद्राने मुलांना त्यांच्या पालकांच्या सोबत एका दिवसाच्या कार्यक्रमासाठी आमंत्रित केले. आमच्या स्वयंसेवकांनी घरोघरी जाऊन लोकांना निमंत्रण दिल्यामुळे एकूण 52 मुलांनी (ज्यापैकी फक्त 12 मुले अभ्यासींची होती.) अत्यंत उत्साहाने भाग घेऊन गोष्टी सांगितल्या, चित्रे काढली व रंगविली, त्याच बरोबर खेळ–खेळले. अभ्यासींच्या मुलांनी एका नाटिके द्वारे संपत्ती जमविण्यातील निरर्थकता सुंदररित्या दाखविली.

सर्वांच्या भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केली गेली. मुले कार्यक्रमात दंग असताना त्यांचे पालक सहज मार्ग व अध्यात्मावरील भाषण ऐकत होते. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी साधना सुरू करण्याची तयारी दर्शविली.




### अहमदाबाद

अभ्यासींच्या मुलांसाठी उन्हाळी शिबीर हे आता अहबदाबाद केंद्रासाठी नित्याचे झाले आहे. 26 ते 29 मे दरम्यान अशाच चौथ्या शिबीरात 34 मुलांनी भाग घेतला. शिबीराचा उद्देश मुलांमधील सर्जनशीलतेला वाव मिळण्यासाठी पोषक वातावरण मिळवून देणे व त्या बरोबरच त्यांना नवीन मैत्रीचे जग उपलब्ध करून देणे असा होता.

या उपक्रमामध्ये विधायक गोष्टी लिहिणे, ट्रेझर हंट, कलाकुसर, मडकी बनविणे तसेच प्रश्नमंजुषा इ.चा समावेश होता. इस्कॉन मंदिराच्या सहलीचा मुलांनी आनंद लुटला. त्यामध्ये भगवान कृष्णाची जीवनकथा चित्रांमध्ये सादर केलेली आहे, त्याच बरोबर सुंदरवन नेचर पार्कमधील सहली मध्ये त्यांना सापाच्या जीवनाबद्दल व सवयींबद्दल जवळून माहिती मिळाली. शेवटच्या दिवशी मुलांनी भांडी व डिशेस धुण्याचा प्रयत्न केला. त्याना अन्न व पाण्यासारख्या स्त्रोतांची बचत करण्याचे शिक्षण मिळाले. या उत्साहवर्धक उन्हाळी शिबीराचा लाभ मुलांमध्ये पर्यावरणाची जाण निर्माण होऊन सर्जनशील तंत्र हस्तगत होण्यात झाला.




### नंजनगुड



नंजनगुड हे म्हैसूर जवळ एक छोटे शहर आहे. सलग तिसऱ्या वर्षी, आपल्या मिशनच्या स्वयंसेवकांनी शाळेतील मुलांसाठी एका महिन्याचे उन्हाळी शिबीर 13 एप्रिल पासून दररोज स. 9 ते दु. 12 पर्यंत घेतले. श्री निलकंठेश्वर एज्युकेशनल सोसायटी स्कूलमध्ये याचे आयोजन केले होते.

सकाळी मिशनच्या प्रार्थनेने सुरवात होत. त्यानंतर रंगकाम, कलाकुसर, गायन, संगीत, प्रश्नमंजुषा इ. उपक्रमामध्ये मुले दंग होत. वेगवेगळ्या शाळांमधील व जवळपासाच्या खेड्यांमधून अंदाजे 150 विद्यार्थी यात सहभागी झाले. मुलांनी केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन पालकांच्या निरिक्षणासाठी भरविले गेले.

11 मे रोजी समारोपा निमित्त आयोजिलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी बेंगलोरहून बंधू प्रभाकर आले होते. म्हैसूरचे बंधू श्रीनिवास व मुख्याध्यापिका भगिनी रत्ना भट्टाचारजी हे दोघे कार्यक्रमाचे मुख्य अतिथी होते. संस्थेचे अध्यक्ष श्री के बी सोमशेखर आपल्या भाषणात म्हणाले की आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली असलेल्या सध्याच्या समाजात मूल्यांचा ऱ्हास होत असून ती अंगी बाणविण्याची हीच योग्य वेळ आहे.

## 13 ते 19 वयोगटातील मुलांसाठी संधी, अहमदाबाद

तेरा ते एकोणिस या वयोगटातील मुले (टीन) जीवनाच्या उंबरठ्यावर उभी असताना जीवनातील संभ्रमावस्थेत असतात. त्यांच्या मधील मूल्याधारित गोष्टींची पोकळी भरून काढण्यासाठी या वयोगटातील एकोणिस मुले अहमदाबादच्या आश्रमात 24 व 25 मे रोजी एका कार्यशाळेत एकत्र आली. या कार्यशाळेचा उद्देश सामुहिक शिक्षण देणे हा होता. भाग घेतलेल्या मुलांनी स्वत:च उपक्रमाची आखणी करून, आपसात व्यूहशास्त्र, अर्थशास्त्र, मूल्यांकन व अहवाल अशा भूमिका वाटून घेतल्या.

जीवनातील वास्तविक प्रसंगावर आधारित नाटिकेमधून मुलांनी आपल्या क्रोधावर, नैराश्यावर व नकारात्मक भावनांवर अंकुश ठेवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. सर्वात उत्सुकतेचा उपक्रम म्हणजे मुलांना रु 10,000 पर्यंतचे मासिक अंदाजपत्र तयार करण्यास सांगण्यात आले. या मधून त्यांना पैशाची किंमत तसेच त्यांच्या पालकांच्या आर्थिक अडचणी यांची जाणीव होऊन आवश्यकता व इच्छा या मध्ये फरक करण्याची शिकवण मिळाली.

मिशनच्या पुस्तकांचे व मासिकांचे वाचन झाल्यानंतर नैतिकता, शिस्त आणि सत्य या विषयांवर आधारित फलकांच्या सहाय्याने वैयक्तिक मते सादर करण्यात आली. एका सामूहिक खेळातून जीवनातील अग्रक्रमांवर प्रकाश टाकण्यात आला.

स्मरणशक्ती वाढीवर डॉ जितेंद्र जेटवा यांनी मार्गदर्शन केले तर बंधू खार यांनी स्वयंसेवक व व्यावहारिक बाबींवर चर्चा केली. या नंतर मुलांनी समूहगान केले. बंधू सुरेश राजगोपालन यांनी चारित्र्य निर्माणासाठी मूल्याधारित जीवनाची तसेच आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी मिशनच्या प्रार्थनेची उपयुक्तता सांगितली.




## सहज कॅम्प, हैद्राबाद

थुमकुंटा येथील झोनल आश्रमामध्ये दि. 9 मे ते 11 मे 2008 दरम्यान, 9 ते 17 वयोगटातील मुलांसाठी सहज कॅम्प आयोजित करण्यात आला. दोन्ही दिवशी खेळा सोबतच मुले उत्सुकतेने मूल्याधारित व वैचारिक चर्चेकडे देखील वळत होती. ग्रंथालयात जाऊन पुस्तकेपण वाचत होती. उन्हाळा असल्यामुळे दुपारच्या वेळेत बुध्दीबळ, कॅरम, कोडी, ओरिगमी, वैदिक गणित इ. बैठे खेळ झाले तर संध्याकाळी मैदानी उपक्रम झाले. संध्याकाळी मोठ्यामुलांनी मैदानी खेळावर भर दिला तर लहान मुलांनी मौजमजेच्या खेळात आनंद लुटला. शनिवारी संध्याकाळी व रविवारी दुपारी मुलांना चित्रपट दाखविण्यात आला. स्वत:चे विचार व सूचना निर्भिडपणे मांडण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देण्यात आले.

## इंदौर




आपल्या मिशनच्या साहित्यामध्ये दडलेले असीम ज्ञान उजेडात आणण्यासाठी 18 मे 2008 रोजी युवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची तयारी तीन आठवड्यापासून चालली होती. 25 युवांनी सामिल होण्याची तयारी दर्शविली. प्रेम, वैराग्य, ज्ञान व भक्ती असे चार गट पाडण्यात आले. प्रत्येक गटाला एक पुस्तक देण्यात आले व त्याचे सादरीकरण करण्यास सांगितले. या गटांचे समन्वयक होते बंधू सुरेंद्र त्रिपाठी, बंधू भूपेंद्र भटोरे, बंधू सचिन खेंडेकर व बंधू अमित भटोरे. प्रत्येक गटामध्ये एक ज्येष्ठ अभ्यासी मार्गदर्शनासाठी नेमला होता. बंधू राजेश रावेरकर यांनी कार्यक्रमाचे संचलन केले तर बंधू रमाकांत अगरवाल यांनी कार्यक्रम समन्वयकाचे काम पाहिले.

एकाच पुस्तकात इतके संदेश असू शकतात, इतक्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून त्याच्याकडे पाहिले जाऊ शकते, व त्यापासून वेगवेगळ्या संकल्पना व विचार प्रसृत होऊ शकतात ही एक विलक्षण बाब होती. आम्हाला असे प्रकर्षाने जाणवले की या दैवी लिखाणामधून गुरुदेव आम्हाला ज्या गोष्टी सांगू इच्छितात त्या सर्व गोष्टी पूर्वकल्पनांना बाजूला ठेवून एके दिवशी आम्ही नक्कीच उन्नत होऊन पाहू शकू, जाणून घेऊ शकू.

## चिल्ड्रेन सेंटर जयपूरचा कार्यक्रम



11 मे रोजी तीन ते सतरा वर्षे वयोगटातील 40 मुलांनी दोन तासाच्या कार्यक्रमातून त्यांच्यातील गुणवत्ता सादर केली. मूल्याधारित गोष्टी, कविता, गुरुप्रेम व्यक्त करणारी गाणी इ. मधून मुलांनी उपस्थित अभ्यासी श्रोत्यांची मने आनंदित केली. दोन नाटिका सादर करण्यात आल्या, त्यांचा संदेश होता,‘धर्म तोडतो, अध्यात्म जोडते’ आणि ‘ईश्वर सर्वव्यापी आहे’. ही मुले या कार्यक्रमाची तयारी बऱ्याच दिवसांपासून दर रविवारी चिल्ड्रेन सेंटरमध्ये करीत होती.

लहान मुलांच्या कार्यक्रमाने प्रोत्साहित होऊन काही मोठ्या मुलांनी देखील समूहगान केले. कार्यक्रमाच्या शेवटी गुरुदेवांची उपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती. एकूण या मुलांना व्यासपीठावर आपल्या कलागुणांना सादर करण्याचा चांगला अनुभव मिळाला त्याबरोबरच अभ्यासींना ही मुले गुरुदेवांच्या प्रेमछत्राखाली वाढत असलेली पाहण्याचा आनंद मिळाला.



# प्रकाश केंद्रे (सेंटर्स ऑफ लाईट)

## आणखी एक हिमालय प्रवेशद्वार – पिथोरागड



"मी आश्रमाला प्रकाशकेंद्र म्हटले आहे. एक जुनी समज आहे की ईश्वराला जेव्हा योग्य वेळ आलेली आहे असे वाटते तेव्हा तो दिव्यलोकाची काही द्वारे उघडण्याची अनुमती देतो. अर्थात पहिले द्वार म्हणजे अशी द्वारे स्थापित करण्यासाठी येणारे महान व्यक्तिमत्व असते. ते आम्हाला शिकवण देतात. ते संदेश देतात. ते बोलावतात. लोकांना एकत्र येऊन तेथून भरारी घेण्यासाठी एक ठिकाण आम्ही तयार करतो, एक आश्रम उभा करतो. याचा योग्यप्रकारे वापर केल्यास खऱ्या अर्थाने हे एक दिव्यलोकाकडे घेऊन जाणारे प्रवेशद्वारच ठरते." हे आहेत आपल्या गुरुदेवांचे, 19 डिसेंबर 2004 रोजी पिथोरागड आश्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगीचे बोल.

हे आश्रम समुद्रसपाटीपासून 5400 फूट उंचीवर असून सतखोल आश्रमाच्या ईशान्येस, 150 कि.मी. अंतरावर, पिथोरागड जिल्हयात स्थित आहे. स्वत: गुरुदेवांनी या आश्रमाचा मूळ आराखडा बनविलेला असून एखाद्या शिंपल्यातील मोत्याप्रमाणे, हिमालयाच्या कुशीत विसावा घेत असल्यासारखा दिसणाऱ्या या आश्रमाच्या पूर्वेला नेपाळ असून उत्तरेला तिबेट आहे. 500 लोक बसू शकतील अशा ध्यानकक्षाव्यतिरिक्त, मास्टर कॉटेज, स्वयंपाकगृह व एक खोली अशा इतर सोयी आहेत.




या आश्रमाचे बांधकाम म्हणजे एक पराक्रमगाथाच आहे. सर्व बांधकाम साहित्य इतक्या उंचीवरील पर्वतराजीतून 150 कि.मी. अंतरावर घेऊन जावे लागले. एप्रिल 2004 मध्ये सुरू झालेले बांधकाम गुरुदेवांच्या कृपेमुळे केवळ नऊ महिन्याच्या आत पूर्ण झाले. अद्याप डॉर्मिटरी तयार व्हावयाच्या असल्यामुळे पूर्व परवानगीशिवाय अभ्यासींना या आश्रमास भेट देण्यास गुरुदेवांची अनुमती नाही.





To subscribe to this Newsletter please visit http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp
For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2008 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This message may be edited for content and is intended exclusively for the members of SRCM.